विशेष

# कोणावर ओढवणार 'ग्रहण' ?

- **मनीष पोतदार,** ज्योतिषविशारद

*सूर्यग्रहणाच्या काळात मोठ्या नैसर्गिक आपत्ती ओढवू शकतात. त्याचप्रमाणे राजकीय क्षेत्रातील विशेषत: सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांवर मोठी संकटे ओढवू शकतात. मोठ्या पदावर असणाऱ्या अधिकाऱ्यांनाही ग्रहणाचे अनिष्ट परिणाम जाणवू शकतात. प्रत्येकाच्या राशीप्रमाणे ग्रहणाचे परिणाम वेगवेगळे असतात. या काळात मन शांत, स्थिर ठेवणे अत्यंत आवश्यक आहे.*

**या**वेळी होणारे खग्रास सूर्यग्रहण ही सर्वांसाठीच एक दुर्मीळ संधी आहे. तब्बल १२० वर्षांनंतर अशा प्रकारचे ग्रहण होत असल्याने त्याचे विशेष महत्त्व आहे. ग्रहणांविषयी आपल्याकडे बरेच समज-गैरसमज आहेत. ग्रहण म्हणजे संकट, अनिष्ट घटना असाच अर्थ लावला जातो. त्यामध्ये थोडेफार तथ्य असले तरी ग्रहण म्हणजे सरसकट वाईटच असा अर्थ लावू नये. आज वैज्ञानिक प्रगतीमुळे ग्रहणांविषयी बऱ्याच प्रमाणात जागृती झाली आहे. ज्योतिषशास्त्रदृष्टचा विचार करता वेगवेगळ्या राशींप्रमाणे ग्रहणांचे परिणामही वेगवेगळ्या प्रकारचे असतात. प्रत्येकाला आपापल्या राशीप्रमाणे, पत्रिकेप्रमाणे ग्रहणाचे वेगवेगळे परिणाम जाणवतात. यावेळी होणाऱ्या खग्रास सूर्यग्रहणाच्या बाबतीतही अशाच पद्धतीने वेगवेगळ्या प्रकारचे परिणाम जाणवतील.

ज्योतिषशास्त्राच्या दृष्टीने विचार करता चंद्रग्रहण आणि सूर्यग्रहण यांचे वेगवेगळ्या प्रकारचे परिणाम संभवतात. सर्वसामान्यपणे चंद्रग्रहणाचा परिणाम मनावर होतो. या काळात मानसिकता बिघडण्याची शक्यता दाट असते. म्हणजेच एखादी व्यक्ती चंद्रग्रहणाच्या काळात आक्रमक होऊ शकते किंवा तिला टोकाचे नैराश्य येऊन ती आत्महत्त्येसारखा मार्गही पत्करु शकते. काही व्यक्ती या काळात चुकीची विधाने करुन अडचणीत येऊ शकतात. थोडक्यात चंद्रग्रहणाचा संबंध मानसिकतेशी असल्यामुळे संवेदनशील व्यक्तींनी विशेष काळजी घेणे आवश्यक असते.

सूर्यग्रहणाच्या काळात मोठ्या दुर्घटना होण्याची दाट शक्यता असते. विशेषत: खग्रास सूर्यग्रहणाच्या काळात अशा शक्यता अधिक असतात. सूर्यग्रहणाचा सर्वाधिक परिणाम राज्यकर्त्यांवर होण्याची शक्यता असते. त्यातही सत्ताधारी राजकीय पक्षाला, त्यांच्या नेत्याला सूर्यग्रहणाचे विशेष दुष्परिणाम जाणवू शकतात. एखाद्या विशिष्ट समूहाचे नेतृत्त्व करणाऱ्या व्यक्तीवर या व्यक्तीचा विशेष परिणाम होऊ शकतो. सूर्यग्रहणाचा परिणाम म्हणून राज्यकर्त्यांवर गंडांतर येऊ शकते. सत्ताधारी राजकीय पक्षाचे नेतृत्त्व करणाऱ्या व्यक्तीवर एखादे मोठे संकट ओढवू शकते. त्यादृष्टीने या सूर्यग्रहणाच्या वेळी सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांनी, राजकारणाशी संबंधित व्यक्तींनी विशेष सतर्क राहणे आवश्यक आहे.

राज्यकर्त्यांप्रमाणेच मोठ्या अधिकाऱ्यांवरही सूर्यग्रहणाचे अनिष्ट परिणाम जाणवू शकतात. जिल्हाधिकारी, पोलिस प्रमुख किंवा प्रशासकीय सेवेतील तत्सम मोठ्या अधिकाऱ्यांनी सूर्यग्रहणाच्या काळात विशेष सावध असणे आवश्यक आहे, असे ज्योतिषशास्त्र सांगते. या अधिकाऱ्यांना ग्रहणकाळात युध्दपातळीवर एखादी मोठी योजना राबवावी लागू शकते. एखादी नैसर्गिक आपत्ती ओढवून या अधिकाऱ्यांना यंत्रणा कामाला लावावी लागू शकते. यावेळी देण्यात आलेला दहशतवादी हल्ल्याचा इशारा, जोरदार पर्जन्यवृष्टीचा इशारा या पार्श्वभूमीवर विशेष सावध राहण्याची आवश्यकता आहे.

सूर्यग्रहणाच्या काळात भूकंप, अतिवृष्टी, पूर यासारख्या नैसर्गिक आपत्तींचा सामना करावा लागू शकतो. यावेळच्या सूर्यग्रहणाचा विचार करताना भारताच्या उत्तरेकडील भागाला आणि उत्तर-पूर्व भागाला अतिवृष्टीचा धोका संभवू शकतो. अतिवृष्टीमुळे पूर येणे, त्यामध्ये मोठी हानी होणे यासारखी संकटे या भागांवर ओढवू शकतात. त्यामुळे या भागातील यंत्रणांनी विशेष सज्ज राहण्याची आवश्यकता आहे. याठिकाणी मोठी आपत्ती ओढवून त्यासाठी उपाययोजना कराव्या लागू शकतात. सध्या सर्वत्र जोरदार पाऊस होत आहे. या पार्श्वभूमीवर विशेष काळजी घेणे आवश्यक आहे.

हे झाले राज्यकर्ते किंवा मोठे अधिकारी यांना जाणवणारे परिणाम. आता सर्वसामान्यांना या ग्रहणाचे काय परिणाम जाणवणार आहेत याचा विचार करुया. सर्वसामान्य व्यक्तींनी ग्रहणाच्या काळात कोणत्याही प्रकारचे महत्त्वाचे निर्णय घेणे टाळावे. त्याचप्रमाणे कोणतेही मोठे, महत्त्वाचे व्यवहार या काळात करु नयेत. त्याचे विपरित परिणाम जाणवू शकतात. कोणत्याही नव्या कामाचा प्रारंभ ग्रहण काळात करणे टाळावे.

ग्रहण काळात प्रत्येकानेच आपले मन स्थीर ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न करणे आवश्यक आहे. मन शांत, स्थीर ठेवण्यासाठी अध्यात्मिक गोष्टींवर भर द्यावा. कुलदेवतची किंवा आपल्या आराध्य दैवताची पूजा, गुरुमंत्राचा जप करावा. चंद्रग्रहणाच्या काळात ॐ नम: शिवाय या मंत्राचा जप करून शंकराची आराधना करावी. तर सूर्यग्रहणाच्या काळात गायत्री मंत्राचा जप करावा. शिवाय कुलदैवताची आराधना करावी. ज्यांना एखाद्या तिर्थक्षेत्री जाणे शक्य आहे त्यांनी तेथे जाऊन स्नान करावे. या काळात जेवढी पुण्यकर्मे करता येणे शक्य आहेत तेवढी करावीत. ग्रहणाच्या काळात मन दूषित होते. त्यामुळे मनावर जेवढे संस्कार करता येतील तेवढे करण्याचा प्रयत्न करावा. त्यासाठी अध्यात्मिक गोष्टींचा आधार घेणे सर्वोत्तम ठरते. अनेकजण ग्रहणाच्या काळात अन्न सेवन करत नाहीत. अनेकजण ग्रहणानंतर अन्न-पाणी शुद्ध करून घेतात. त्यासाठी त्यावर तुळशीपत्र ठेवले जाते. काहीजण नव्याने अन्न शिजवून सेवन करतात. पण असे करणे प्रत्येकाला शक्य नसते. त्यामुळे तुळशीपत्र ठेवण्याचा पर्याय सर्वसामान्यपणे निवडला जातो.

ग्रहणाच्या काळात गर्भवती स्त्रिया, लहान मुले किंवा संवेदनशील व्यक्तींनी विशेष काळजी घ्यायला हवी. विशेषत: मानसिकदृष्टचा कमकुवत, हळव्या स्वभावाच्या व्यक्तींनी विशेष सतर्क राहणे आवश्यक आहे. अर्थात या व्यक्तींनी ग्रहण पाहण्यासाठी मिळणारे चष्मे किंवा अन्य उपकरणे वापरून ग्रहण पाहण्यास हरकत नाही. मात्र यावेळी ऐन पावसाळ्यात सूर्यग्रहण होणार असल्याने ते पाहणे शक्य होईल की नाही याबद्दल शंका आहे. ग्रहण ही वैज्ञानिकदृष्ट्या दुर्मीळ संधी असल्याने ते पाहण्याचा आनंद घ्यायला काहीच हरकत नाही. वेगवेगळ्या राशींप्रमाणे ग्रहणाचे परिणामही वेगवेगळे होत असतात हे आपण पाहिलेच आहे. एखादे मोठे काम करायचे असेल तर त्यावर विपरित परिणाम होऊ शकतात. तथापि, नोकरी-व्यवसाय, दैनंदिन कामे करणाऱ्यांवर त्याचा फारसा परिणाम होणार नाही. तथापि, ग्रहणाचे वेध लागल्यापासून ग्रहण सुटेपर्यंत कोणतीही महत्त्वाची कामे करणे टाळावे.

या वेळच्या सूर्यग्रहणाची शुभाशुभ फले आता पाहूया. वृषभ, कन्या, तुला आणि कुंभ या राशींना या ग्रहणाची शुभफले मिळणार आहेत. मिथुन, वृश्चिक, मकर आणि मीन या राशींना मिश्र फले तर मेष, कर्क, सिंह आणि धनू या राशींना अनिष्ट फले मिळणार आहेत. त्यामुळे अनिष्ट फले असणाऱ्या राशीच्या व्यक्तींनी विशेष सावध असणे आवश्यक आहे. अर्थात लग्नरास आणि चंद्ररास या दोन्हीप्रमाणात ही फले मिळतात. अनेकजण ग्रहणाच्या काळात दान करतात. तथापि हा ज्याच्या त्याच्या श्रद्धेचा भाग आहे. ग्रहणाच्या काळात वैश्विक शक्ती क्षीण झालेली असते. त्यामुळे मंत्रजप करून ही शक्ती वाढवण्याचा प्रयत्न प्रत्येकाने करावा.

(संपर्क : ९३७१००४६९९)